**RNI No. MAHBIL /2009/36619**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष ११, अंक ४७]** **गुरुवार, सप्टेंबर ११, २०२५/भाद्रपद २०, शके १९४७** **[पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००**

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उपविभागीय अधिकारी, अलिबाग उपविभाग, अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

ज्याअर्थी, खाली दर्शविलेल्या अनुसूचीप्रमाणे समुचित शासन **मौजे राजेवाडी, ता.अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्प अलिबागच्या धरण पोहोच रस्त्याकरिता संपादनाकामी** कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली, ता.पेण यांसाठी जमीन संपादन करू इच्छीते;

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या प्रकरण दोन प्रमाणे समुचित शासनास सामाजिक आघात व सार्वजनिक प्रयोजन निर्धारीत करण्याबाबत प्राथमिक अन्वेषण करणे गरजेचे आहे.

त्याअर्थी, उपरोक्त कायद्याचे कलम ४ चे पोट-कलम (१) अन्वये समुचित शासन बाधित क्षेत्रातील ग्रामस्थरावरील किंवा प्रभाग स्तरावरील संबंधित पंचायतीशी, नगरपालिकेशी किंवा यथास्थिती महानगरपालिकेशी विचारविनिमय करील आणि अधिसूचनेद्वारे अशा शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रितीने व अशा तारखेस, त्यांच्याशी विचारविनिमय करून सामाजिक आघात निर्धारण अभ्यास करील.

उपरोक्त कायदा, २०१३ मधील कलम ३ चे पोट-कलम (ग) प्रमाणे जिल्हाधिकारी, रायगड यांना समुचित शासन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. आणि भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे नियम क्र. २ "छ" नुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी त्यांचे वतीने पुढील कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, अलिबाग उपविभाग, अलिबाग यांना प्राधिकृत केलेले आहे.

त्यामुळे उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड या अधिसूचनेद्वारे अधिसूचित करीत आहे की, बाधित क्षेत्रामध्ये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदींप्रमाणे दिनांक ९ सप्टेंबर २०२५ पासून टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, देवनार, मुंबई ४०० ०८८ यांनी सामाजिक आघात निर्धारण (SIA) अभ्यासाची कार्यवाही सुरू करावी.

**अनुसूची - जमिनीचे वर्णन**

गावाचे नाव : राजेवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>स.नं./ग.नं.</th><th>हिस्सा नंबर</th><th>क्षेत्र हे. आर.</th><th>अ.क्र.</th><th>स.नं./ग.नं.</th><th>हिस्सा नंबर</th><th>क्षेत्र हे. आर.</th></tr>
<tr><td>१</td><td>८</td><td>१ पै.</td><td rowspan="3">०.२५.००</td><td>५</td><td>२८</td><td>१ पै.</td><td rowspan="4">०.३३.००</td></tr>
<tr><td>२</td><td>८</td><td>२ पै.</td><td></td><td>२८</td><td>२ पै.</td></tr>
<tr><td>३</td><td>८</td><td>३ पै.</td><td></td><td>२८</td><td>३ पै.</td></tr>
<tr><td>४</td><td>२७</td><td>० पै.</td><td>०-०६-००</td><td></td><td>२८</td><td>४ पै.</td></tr>
<tr><td colspan="6"></td><td>एकूण</td><td>०-६४-००</td></tr>
</table>

**मुकेश चव्हाण,**
उपविभागीय अधिकारी, अलिबाग
उपविभाग, अलिबाग.

अलिबाग,
दिनांक : ९ सप्टेंबर २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.